# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, शिवाजी नगर, पुणे ४११ ०१६
E-Mail : vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३


क्रमांक - उशिसं/ कॅस /एम. फील/**२०२२** विशि-१ 96930 दिनांक - १ डिसेंबर २०२३

01 DEC 2023

प्रति,

१. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
सर्व विभाग

२. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय - एम. फील. अर्हता धारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करणेबाबत..**

**संदर्भ - १. शासन पत्र क्र. संकीर्ण -२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दि.३०.११.२०२३**
**२.शासन पत्र क्र. संकीर्ण -२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दि.१६.०२.२०२३**
**३.संचालनालयाचे पत्र क्रउशिसं/कॅस/एम.फील/२०२२विशि-१ १७४७दिनांक १७.२.२०२३**

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भीय क्र.१ शासन पत्राचे अवलोकन व्हावे. सोबत प्रत जोडली आहे.

उपरोक्त विषयी एम.फील अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भात संदर्भीय शासन पत्र दिनांक १६.२.२०२३ नुसार स्पष्टीकरण देण्यात आले होते. मात्र सदर शासन पत्राचा चुकीचा अर्थ लावून दिनांक १४ जून २००६ ते दिनांक ११ जुलै २००९ या दरम्यान एम.फील. झालेल्या अनेक अध्यापकांना कॅस प्रमोशन नाकारण्यात आल्याची मा.डॉ मनिषा कायंदे विधान परिषद सदस्य यांनी बाब निदर्शनास आणली आहे. यास्तव शासन पत्र दिनांक १६.२.२०२३ चे पत्रामध्ये सुधारणा करण्याची विनंती केली आहे. याअनुषंगाने संदर्भीय क्र १ चे शासन पत्र दिनांक ३०.११.२०२३ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिनांक ५ सप्टेंबर २०२२ पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचना विचारात घेवून खालील प्रमाणे कळविले आहे.

- दिनांक १४ जून २००६ रोजी अथवा तत्पूर्वी नियुक्त झालेल्या अध्यापकांनी सेवेत असतांना दिनांक १ जानेवारी ११९४ ते ११ जुलै २००९ या कालावधीत एम.फील. ही पदवी प्राप्त केली असल्यास त्यांना खालील अटी व शर्तीच्या अधीनतेने कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील .

१.अध्यापकांची नियुक्ती विहीत निवड समितीच्या माध्यामातून झालेली असावी.

२.विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली अर्हता सदर अध्यापकांनी पूर्ण करणे आवश्यक आहे.

३.अध्यापकांची नियुक्ती नियमित स्वरूपात असणे आवश्यक आहे.

४.अश्या अध्यापकांना एम.फील/पीएच.डी. यापदव्यांच्या आधारे एन.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देवून विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या नावासहित तसे संबधित विद्यापीठांना कळविले असणे आवश्यक आहे.

वरील अटींची पूर्तता करणा-या अध्यापकांना पुढील प्रमाणे कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील -

अ ) अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फील अर्हता धारण केली असेल तर त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.

ब) अध्यापकांनी सेवेत असतांना एम.फील.अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेवून , विद्यापीठाने संबधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अश्या दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.

प्रस्तुत विषयी संदर्भीय शासन पत्र दिनांक ३०.११.२०२३ नुसार कळविल्याप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

( डॉ.शैलेंद्र देवळाणकर )
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रत - मा प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

मंत्रालयीन सेवा

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

ई-मेल. vishi१-hted@mah.gov.in दूरध्वनी क्र. ०२२७९३१७४

क्रमांक:- संकिर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दिनांक:- ३० नोव्हेंबर, २०२३

प्रति,
१) संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सर्व विभागीय सह संचालक,
उच्च शिक्षण.

**विषय:-** एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करण्याबाबत.

**संदर्भ:-** १) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.एफ-९-१२/२०२०/ (पीएस/एमआयएससी) दिनांक ५ सप्टेंबर,२०२२.
२) समक्रमांकाचे दिनांक १६ फेब्रुवारी,२०२३ चे पत्र.
३) मा.डॉ.मनीषा कायंदे, वि.प. सदस्य यांचे पत्र क्रमांक ८८१/२०२३ दिनांक २ नोव्हेंबर,२०२३.

एम.फील. अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भात दिनांक १६ फेब्रुवारी,२०२३ च्या पत्रान्वये स्पष्टीकरण देण्यात आले आहे. सदर पत्राचा चुकीचा अर्थ लावून दिनांक १४ जून,२००६ ते दिनांक ११ जुलै,२००९ या दरम्यान एम.फील. झालेल्या अनेक अध्यापकांना कॅस प्रमोशन नाकारण्यात आल्याची बाब मा.डॉ.कायंदे यांनी निदर्शनास आणाली आहे. यास्तव, उपरोक्त दिनांक १६ फेब्रुवारी,२०२३ च्या पत्रामध्ये सुधारणा करण्याची विनंती मा.डॉ.कायंदे यांनी केली आहे.

०२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ५ सप्टेंबर,२०२२ च्या पत्रान्वये एम.फील. पात्रतेसंदर्भात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण / मान्यता देण्यात आली आहे:-

the teachers appointed through duly constituted selection committee on or before 14th June, 2006 and *have acquired M.Phil. degree in service* between 1st January, 1994 to 11th July, 2009 are entitled for Career Advancement Scheme (CAS) and all consequential benefits as per norms, provided that those teachers have received exemption from NET, on the basis of M.Phil./Ph.D. Further, the actual date of effect for grant of exemption to particular candidates shall be the date of exemption actually granted by the Universities to the concerned candidates appointed on "Regular Basis" and fulfilment of eligibility criteria of the then Regulations.

३२९

०३. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उपरोक्त पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचना विचारात घेऊन खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे:-

दिनांक १४ जून,२००६ रोजी अथवा तत्पुर्वी नियुक्त झालेल्या अध्यापकांनी *सेवेत असताना* दिनांक १ जानेवारी,१९९४ ते ११ जुलै,२००९ या कालावधीत एम.फील. ही पदवी प्राप्त केली असल्यास त्यांना खालील अटी व शर्तींच्या अधीनतेने कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.

(१) अध्यापकांची नियुक्ती विहित निवड समितीच्या माध्यमातून झालेली असावी.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली अर्हता सदर अध्यापकांनी पूर्ण करणे आवश्यक आहे.

(३) अध्यापकांची नियुक्ती नियमित स्वरुपात असणे आवश्यक आहे.

(४) अश्या अध्यापकांना एम.फील./पीएच.डी. या पदव्यांच्या आधारे एन.ई.टी.परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविले असणे आवश्यक आहे.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या अध्यापकांना पुढील प्रमाणे कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील:-

(अ)अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फील. अर्हता धारण केली असेल तर त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.

(ब) अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, विद्यापीठाने संबंधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अश्या दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.डॉ.मनीषा कायंदे, विधान परिषद सदस्य.

२) अध्यक्ष, महाराष्ट्र युनियन ऑफ सेक्यूलर टिचर्स.

३) निवड नस्ती कार्यासन विशि-१